# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 27/01/2021 (बुधवार)
(सकाळ)

---

### दुखापत

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 20 कि. मी. अंतरावर मौजा खराळा येथे दिनांक 25/01/2021 चे 11:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– नितिन धनराजजी ठाकरे, वय 41 वर्ष, रा. खराळा हे चौकात उभे असता आरोपी नामे– 1) दिलीप लालाजी ठाकरे, 2) पंकज अन्नजी ठाकरे व 3) चेतन अन्नाजी ठाकरे तिन्ही रा. खराळा तिथे आले व फिर्यादीला म्हणाले की, ''सुरेखा हिचे अंगावर गाडी का आणली.'' या कारणावरुन आरोपीतांनी फिर्यादी सोबत भांडण करून हातबुक्कीने व काठीने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 324, 34 भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोना प्रजोक तायडे 8308964714 पो.स्टे जलालखेडा हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावर मौदा रोड एसके रेस्टॉरेन्ट समोर येथे दिनांक 26/01/2021 चे 16:45 वा. दरम्यान पवन नामदेव खेकडे(मृतक), वय 28 वर्ष, रा. हिवरा ता. पारशिवनी हा आपली एमएच–40/बीएक्स– 5572 क्रमांकाच्या मोटरसायकलने भरधाव वेगाने रामटेक वरून मौदा रस्त्याने जात असतांना एस के लॉजींग बोर्डीगच्या लोखंडी ॲगलला त्याने धडक दिली. त्यामुळे त्याच्या डोक्याला मार लागुन जखमी होवुन तो स्वतःचे जागीच मरण पावण्यास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– आदेश सुनिल धमगाये, वय 26 वर्ष, रा. आंबाळा वार्ड रामटेक यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री शेंडगे पो स्टे रामटेक मो न 9011253003 हे करीत आहे.

2) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर मौजा चंद्रपुर ते बुटीबोरी रोड पंकज नर्सरी समोर येथे दिनांक 24/01/2021 चे 18:30 वा. ते 18.50 पर्यंत युवराज माणीकराव चौधरी(मृतक), वय 57 वर्ष, रा. गोदावरी नगर वार्ड नं 2 बुटीबोरी ता जि नागपुर हा त्याची एमएच– 40/वी– 3889 क्रमांकाच्या मोटरसायकलने मौजा खापरी सुभेदार येथील शेतातुन घरी बुटीबोरी येथे परत येत असता अज्ञात वाहन चालक आरोपीने त्यास धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी झाल्याने त्यांला उपचाराकरीता माया हॉस्पीटल बुटीबोरी व तेथुन न्युरॉन हॉस्पीटल नागपूर येथे नेले असता उपचारा दरम्यान मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शरद माणीकराव चौधरी, वय 43 वर्ष, रा. गोदावरी नगर वार्ड नं 2 बुटीबोरी ता जि नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री चौधरी पो.स्टे बोरी मो क्र 9273237381 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर